**BOMBAY ACT No. XXIII OF 1959.**

PRISONS AND CIVIL JAILS (BOMBAY EXTENSION, UNIFICATION AND AMENDMENT) ACT, 1958.

मुंबई विधानसंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति तारीख २१ एप्रिल १९५९ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

**BOMBAY ACT No. XXIII OF 1959.**

AN ACT TO EXTEND THE PRISONS ACT, 1894, AND THE CIVIL JAILS ACT, 1874 TO THE REST OF THE STATE OF BOMBAY AND TO BRING THOSE ACTS INTO FORCE THEREIN; TO PROVIDE UNIFORMITY IN THE PROVISIONS OF THOSE ACTS IN THEIR APPLICATION TO THE WHOLE OF THE STATE; AND FOR THOSE AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THE AFORESAID ACTS AND TO REPEAL CORRESPONDING LAWS IN FORCE IN THOSE PARTS OF THE STATE TO WHICH THE ACTS ARE NOW EXTENDED.

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख २७ एप्रिल १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ व दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्याबाबत आणि त्यांत ते अधिनियम अंमलांत आणण्याबाबत; संबंध राज्याला ते लागू करतांना त्या अधिनियमांच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतद करण्याबाबत; आणि त्या व इतर विवक्षित कारणांकरितां उपरोक्त अधिनियम आणखी सुधारण्याबाबत आणि ते अधिनियम राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत आले आहेत त्या भागांत अंमलांत असलेले तत्सम विधि रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ व दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें आणि त्यांत ते अधिनियम

अंमलांत आणणें; सबंध राज्याला ते लागू करतांना त्या अधिनियमांच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करणें, आणि त्या व इतर विवक्षित कारणांकरितां उपरोक्त अधिनियम आणखी सुधारणें आणि ते अधिनियम आतां राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत आले आहेत त्या भागांत अंमलांत असलेले तत्सम विधि रद्द करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा व सुरुवात.

१. (१) या अधिनियमास तुरुंगांबाबत व दिवाणी तुरुंगांबाबत (मुंबई व्याप्ति वाढविणें, एकसूत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५८ असें म्हणावें.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून नेमील अशा तारखेस अंमलांत येईल.

पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई प्रदेशांत अंमलांत असलेला सन १८९४ चा अधिनियम ९ वा राज्याच्या इतर प्रदेशांना लागू करणें.

२. तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्याच्या, आणि त्यांत तो अंमलांत आणण्याच्या कारणांकरितां, आणि सबंध राज्याला तो लागू करतांना त्या अधिनियमाच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करण्याकरितां, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीनंतर, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत (दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून) अशा सुरुवातीच्या निकटपूर्वी अंमलांत असलेला तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ सबंध राज्यास लागू करण्यांत येईल आणि अशा रीतीनें अंमलांत असेल; त्याचा परिणाम म्हणून अशा सुरुवातीनंतर,—

(१) (अ) मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू असलेला हैदराबादचा तुरुंगांबाबत अधिनियम, १९५४,

(ब) मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ अन्वयें अनुकूलन व लागू केलेला तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४,

(क) राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रांत व वऱ्हाडचा कैद्यांबाबत (सुधारणा) अधिनियम, १९३९ व मध्य प्रांत व वऱ्हाडचा तुरुंगांबाबत (सुधारणा) व रद्द करण्यांबाबत अधिनियम, १९४० अन्वयें कैद्यांबाबत अधिनियम, १९०० यांत दाखल केलेला विभाग ६-अ,

हे रद्द झाले आहेत असें समजलें पाहिजे.

(२) वरील उपबंधान्वयें मुंबई राज्यास लागू केलेला व अंमलांत आणलेला तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ (ज्याचा यांत यापुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे) यांत—

(अ) त्याच्या प्रस्तावनेंतील "भाग ब राज्यांत असलेले" या शब्दांपूर्वी "राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याच्या कलम ८ अन्वयें मुंबई राज्याचे भाग बनलेले असे कोणतेहि प्रदेश खेरीज करून" हे शब्द दाखल करावे;

(ब) कलम १ मध्यें—

(१) पोट-कलम (२) मधील "भाग ब राज्यांत असलेले" या शब्दांपूर्वी "राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याच्या कलम ८ अन्वयें मुंबई राज्याचे भाग बनलेले असे कोणतेहि प्रदेश खेरीज करून" हे शब्द दाखल करावे,

(२) पोट-कलम (३) गाळण्यांत यावें.

(३) पोट-कलम (४) मधील "तारीख १ नोव्हेंबर १९५६ च्या निकटपूर्वी अस्तित्वांत असलेल्या मुंबई राज्यांतील मुंबई शहराबाहेरील" या मजकुराऐवजीं "मुंबई राज्यांतील बृहन्मुंबईबाहेरील" हा मजकूर दाखल करावा,

(४) समासांतील टीपेमध्यें असलेल्या "सुरवात" या शद्वाऐवजीं "लागू करणें" हे शद्व दाखल करावे,

(क) कलम ३ ची कंडिका (४) नंतर पुढील कंडिका दाखल करावी:—

"(४-अ) मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशाच्या संबंधांत 'जिल्हा फौजदारी न्यायाधीश' यांच्या उल्लेखांचा अर्थ कलेक्टर व अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीश यांचा उल्लेख आहे अशा रीतीनें लावला पाहिजे ;".

सबंध राज्यांत अंमलांत असलेला सन १८९४ चा अधिनियम ९ वा यांत आणखी सुधारणा.

३. मुंबई राज्यास लागू असलेल्या मुख्य अधिनियमांत,—

(अ) कलम ३ मध्यें कंडिका (५-अ) नंतर पुढील कंडिका दाखल करावी,—

"(५-ब) 'पॅरोल पद्धत' या संज्ञेचा अर्थ त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या नियमांनुसार तुरुंगांतील कैद्यांच्या शिक्षेची मुदत तहकूब करून त्यांना पॅरोलवर सोडण्याची पद्धत, असा समजावा." ;

(ब) कलम ५ यास त्याचें पोट-कलम (१) असा नवा क्रमांक देण्यांत यावा आणि पोट-कलमास अशा रीतीनें नवा क्रमांक दिल्यानंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करावें :—

"(२) राज्य सरकारास, अशा सबंध प्रदेशाकरितां किंवा त्याच्या कोणत्याहि भागाकरितां तुरुंगाचे एक किंवा अनेक डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल नेमण्याचासुद्धां अधिकार आहे, आणि त्यांनीं, राज्य सरकारच्या आगाऊ मंजुरीनें इन्स्पेक्टर जनरल त्यांच्यावर सोंपवील त्याप्रमाणें ह्या अधिनियमान्वयें किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें इन्स्पेक्टर जनरलचे सर्व किंवा त्यापकीं कोणतेहि अधिकार, चालविले पाहिजेत, त्याचीं कर्तव्यें बजावलीं पाहिजेत व कामें पार पाडलीं पाहिजेत." ;

(क) कलमें ४४ व ६१ यांमधील "देशी भाषेंत" या शद्वाऐवजीं "प्रादेशिक भाषेंत" हे शद्व दाखल करावे ;

(ड) कलम ४६ मध्यें—

(१) कंडिका (४) मधील "पद्धतीन्वयें" या शद्वाऐवजीं "किंवा पॅरोल पद्धतीन्वयें" हे शद्व दाखल करावे ;

(२) कंडिका (५) ऐवजीं पुढील कंडिका दाखल करावी:—

"(५) निर्दिष्ट केलेल्या मुदतीकरितां वेतन मिळण्याचा विशेष अधिकार काढून घेणें ;

(५-अ) वरचा दर्जा किंवा वर्ग यावरून खालच्या दर्जात किंवा वर्गांत तात्पुरतें किंवा कायमचें खालीं आणणें, किंवा दर्जा किंवा वर्ग, किंवा सर्व किंवा निर्दिष्ट केलेले तुरुंगांतील विशेष अधिकार काढून घेणें ;" ;

(३) कंडिका (९) व (११) गाळण्यांत याव्यात ;

(इ) कलम ४७, पोट-कलम (१) मधील अपवाद (२) गाळण्यांत यावा ;

(फ) कलम ४८-अ मध्यें—

(१) "फर्लो" या शद्बानंतर "किंवा पॅरोलवर सुटका" हे शद्ब दाखल करावे ;

(२) दुसऱ्यांदा येणाऱ्या "फर्लो" या शद्बानंतर "किंवा पॅरोल" हे शद्ब दाखल करावे ;

(ग) कलम ५०, पोट-कलम (१) मधील "केवळ शासनिक अशाची शिक्षा अगर इतर शिक्षेस जोडून दिलेली शासनिक अशाची शिक्षा अगर" हा मजकूर गाळण्यांत यावा ;

(ह) कलम ५१ नंतर पुढील कलमें दाखल करावींत:—

"५१-अ. ज्या कोणत्याहि अटींवर किंवा त्यांस अधीन राहून शिक्षा तहकूब केली असेल किंवा सूट दिली असेल किंवा पॅरोलवर सुटका केली असेल किंवा फर्लो दिली असेल त्या अटी पूर्ण केल्या नाहींत असे अधिकार चालविणाऱ्या प्राधिकाऱ्याचें मत असेल तर अशा प्राधिकाऱ्यास अशी तहकुबी, सूट देणारा किंवा पॅरोलवर सोडण्याचा किंवा फर्लो मंजूर करणारा आदेश रद्द करण्याचा अधिकार आहे, आणि त्यानंतर ज्या इसमासंबंधीं असा आदेश देण्यांत आला त्या इसमास, तो मोकळा असल्यास, अधिपत्राशिवाय कोणत्याहि पोलीस अधिकाऱ्यानें अटक करण्याचा, आणि त्याची न संपलेली शिक्षा भोगण्यासाठीं त्यास परत पाठविण्याचा अधिकार आहे.

५१-ब. (१) जर कोणताहि कैदी, ज्या कोणत्याहि अटींवर किंवा त्यांस अधीन राहून त्याची शिक्षा तहकूब केली असेल किंवा सूट दिली असेल किंवा त्यास पॅरोलवर सोडलें असेल किंवा त्यास फर्लो मंजूर केली असेल त्या अटी पाळण्यांत पुरेशा कारणांवाचून कसूर करील तर त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा दोन वर्षांच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दण्डाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील (अशी शिक्षा ही अशा कैद्यानें असा अपराध केला तेव्हां तो जी कोणतीहि शिक्षा भोगीत असेल त्या शिक्षेखेरीज आणखी असेल.).

(२) शिक्षा तहकूब करणाऱ्या किंवा शिक्षेत सूट देणाऱ्या राज्य सरकारची किंवा प्राधिकाऱ्याची आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय कोणत्याहि न्यायालयानें ह्या कलमाखालील अपराधाची दखल घेतां कामा नये." ;

(ई) कलम ५९ मध्यें, कंडिका (५) ऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा:—

"(५) गुण देणें, शिक्षा तहकूब करणें, शिक्षेत सूट देणें आणि त्या अनुषंगानें शिक्षा कमी करणें, आणि पॅरोलवर किंवा फर्लो देऊन सोडणें आणि ज्या अटींवर आणि ज्या प्राधिकाऱ्यांकडून शिक्षा तहकूब करतां येईल किंवा शिक्षेत सूट देतां येईल आणि कैद्यांना पॅरोलवर किंवा फर्लो देऊन सोडतां येईल, त्या अटी व तो प्राधिकारी ठरविणें यांसंबंधींचे नियम ;".

४. मुंबई राज्याच्या इतर भागाला दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ लागू करण्याच्या आणि त्यांत तो अंमलांत आणण्याच्या कारणांसाठीं, आणि सबंध राज्याला लागू असल्याप्रमाणेंच्या त्या अधिनियमाच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्याची तरतूद करण्यासाठीं, ह्या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी (दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत अंमलांत असलेला दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ हा याद्वारें सर्व राज्यास लागू

करण्यात येत आहे आणि तो अशा रीतीनें सर्व राज्यांत अंमलांत असेल ; त्यामुळें, मुंबई अधि-
नियम क्रमांक
अशा प्रारंभानंतर,—
२ राज्यांच्या इतर प्रदेशांना लागू करणें.

(१) (अ) कच्छ (विधि लागू करणें) आदेश, १९४९ याद्वारें मुंबई
राज्याच्या कच्छ प्रदेशाला लागू केल्याप्रमाणेंचा दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम,
१८७४, आणि

(ब) सौराष्ट्र राज्य (केंद्रीय आणि मुंबई अधिनियम लागू करणें) अध्यादेश,
१९४८ ह्यान्वयें मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल व लागू केल्या-
प्रमाणेंचा दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४,

हे रद्द होतील ;

(२) पूर्ववर्ति उपबंधानुसार लागू केल्याप्रमाणेंचा आणि अंमलांत आणल्या-
प्रमाणेंचा दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ (ज्याचा ह्यांत "लागू केलेला
दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम" असा उल्लेख केला आहे) यांत,—

(अ) दीर्घ संज्ञेंत "मुंबई शहर व इलाखा यांतील" ह्या शद्बांऐवजीं
"बृहन्मुंबई वगळून मुंबई राज्यांतील" हे शद्ब दाखल करावे ;

(ब) भाग २ मध्यें, "दिवाणी तुरुंग" या शीर्षकाखालीं पुढील कलम दाखल
करावें :—
दिवाणी तुरुंगांना लागू असणें.

"८. हा अधिनियम बृहन्मुंबईबाहेरील मुंबई राज्यांतील दिवाणी तुरुंगांना
लागू असेल." ;

(क) कलम ९ मध्यें "कलम ३ अन्वयें" ह्या मजकुरानंतर "किंवा
राज्याच्या कोणत्याहि भागांत त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि
तत्सम विधीन्वयें" हा मजकूर दाखल करावा ;

(ड) कलम १० मध्यें "नाजीर" या शद्बानंतर "(किंवा कोणत्याहि नांवानें
उल्लेखला जाणारा तत्सम अधिकारी, ज्याचा ह्यांत पुढें "नाजीर" असा उल्लेख
केला आहे)" हा मजकूर दाखल करावा.

बचाव.

५. कलम २ अन्वयें,—

(१) हैदराबादचा तुरुंगांबाबत अधिनियम, १९५४ आणि सौराष्ट्र राज्य
(केंद्रीय आणि मुंबई अधिनियम लागू करणें) अध्यादेश, १९४८ याद्वारें राज्याच्या
सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल व लागू केल्याप्रमाणेंचा तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ ;

(२) मध्यप्रांत आणि वऱ्हाडचा कैद्यांबाबत (सुधारणा) अधिनियम, १९३९
याद्वारें मुंबई राज्याच्या विदर्भ विभागास लागू केल्याप्रमाणेंचा कैद्यांबाबत अधि-
नियम, १९०० यांत दाखल केलेला भाग ६-अ ; आणि

(३) मुंबई राज्याच्या विदर्भ विभागास लागू केल्याप्रमाणेंचा मध्यप्रांत आणि
वऱ्हाडचा तुरुंगांबाबत (सुधारणा) अधिनियम रद्द करण्याबाबत अधिनियम,
१९४० ;

आणि कलम ४ अन्वयें,—

(४) कच्छ (विधि लागू करणें) अध्यादेश, १९४९ याद्वारें मुंबई राज्याच्या
कच्छ प्रदेशास लागू केल्याप्रमाणेंचा दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४ ;
आणि

(५) सौराष्ट्र राज्य (केंद्रीय आणि मुंबई अधिनियम लागू करणें) अध्यादेश,
१९४८ याद्वारें मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल व लागू केल्याप्रमाणेंचा
दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४,

हे रद्द केल्यामुळें,—

(अ) अशा रीतीनें रद्द केलेल्या विधींपैकीं कोणत्याहि विधीच्या पूर्वीच्या
अंमलास, किंवा

(ब) अशा रीतीनें रद्द केलेल्या विधींपैकीं कोणत्याहि विधीन्वयें प्राप्त झालेल्या कोणत्याहि हक्कास, विशेषाधिकारास, पत्करलेल्या बंधनास किंवा प्राप्त झालेल्या जबाबदारीस, किंवा

(क) अशा रीतीनें रद्द केलेल्या विधींपैकीं कोणत्याहि विधीविरुद्ध केलेल्या कोणत्याहि अपराधाच्या संबंधांत प्राप्त झालेल्या कोणत्याहि शास्तीस, जप्तीस किंवा शिक्षेस, किंवा

(ड) वर सांगितल्याप्रमाणेंच्या अशा कोणत्याहि हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, बंधनाच्या, जबाबदारीच्या, शास्तीच्या, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधांतील, कोणत्याहि चौकशीस, वैध कार्यवाहीस किंवा उपाययोजनेस,

बाध येणार नाहीं.

आणि ज्या प्रदेशांत हे विधि अंमलांत होते त्या प्रदेशांत जणूं ह्या अधिनियमास प्रारंभ झाला नव्हता असें समजून अशी कोणतीहि चौकशी करतां येईल, वैध कार्यवाही चालू ठेवतां येईल किंवा उपाययोजना करतां येईल आणि अशी कोणतीहि शास्ति, जप्ति किंवा शिक्षा करतां येईल :

परंतु, पूर्वगामि उपबंधांना अधीन राहून अशा कोणत्याहि विधीन्वयें केलेली कोणतीहि गोष्ट किंवा उपाययोजना (हींत केलेली नेमणूक किंवा सोंपवून दिलेले अधिकार, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश, सूचना किंवा निदेश, केलेला नियम किंवा विनियम किंवा दिलेली परवानगी यांचा समावेश होतो), जेथवर ती मुख्य अधिनियमाशीं किंवा लागू केलेला दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम याच्याशीं विसंगत नसेल तेथवर, त्या अधिनियमांच्या तत्सम उपबंधान्वयें केली आहे असें समजण्यांत येईल आणि मुख्य अधिनियमान्वयें किंवा, यथास्थिति, लागू केलेला दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम यान्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीवरून किंवा कोणत्याहि उपाययोजनेवरून निष्प्रभावित करण्यांत आल्याखेरीज व येईपर्यंत अंमलांत असण्याचें चालू राहील :

तसेंच, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधींतील, किंवा कोणत्याहि लेखांतील किंवा इतर कागदपत्रांतील, अशा प्रकारें रद्द केलेल्या कोणत्याहि विधीच्या, किंवा त्याच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधाच्या, किंवा त्यान्वयें नेमण्यांत आलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या उल्लेखाचा अर्थ, होईल तेथवर, मुख्य अधिनियमाचा किंवा यथास्थिति, लागू केलेल्या दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियमाचा किंवा त्याच्या संबंधित उपबंधांचा किंवा त्यांत निर्दिष्ट केलेल्या किंवा त्यान्वयें नेमण्यांत आलेल्या तत्सम अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकाऱ्याचा उल्लेख आहे असा लावला पाहिजे.

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.

---

## BOMBAY ACT No. XXIV OF 1959.

## THE CRIMINAL LAW AMENDMENT (BOMBAY AMENDMENT AND EXTENSION) ACT, 1959.

**मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति तारीख २२ एप्रिल १९५९ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.**

**एन्. के. द्रविड,**

मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.